नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०६/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण २५,४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १२/०६/२०२४ रोजी फिर्यादी हे पोस्टे भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा महसुल चेक पोस्ट भिवापुर येथे अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) लोड करून चोरटी वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा महसुल चेक पोस्ट भिवापुर येथे अवैध रेती संबंधाने अचानक नाकाबंदी केली असता १२ चक्का टिप्पर क्रं. एम एच ४९ बिझेड ८७३७ चा चालक आरोपी नामे—१) मुकेश अरूण मुळे वय ३० वर्ष रा. पचखेडी ता. कुही जि. नागपुर यास थांबवून चेक केले असता अवैदयरीत्या विनापरवाना रेती चोरी वाहतुक करतांना आढळल्याने आरोपीच्या ताब्यातून १२ चक्का टिप्पर क्रं. एम एच ४९ बिझेड ८७३७ किं २५००००० रू यामध्ये ८ ब्रास रेती प्रत्येकी कि. ५००० रू. प्रमाणे ४०,००० रू असा एकून २५,४०,००० रू. चा. माल अवैद्यरित्या विनापरवाना शासनाचा महसूल बूडवून रेती भरून सार्वजनीक मालमत्तेचे नूकसान करून सरकारी खनिज रेतीची चोरटी वाहतूक करतांना मीळून आल्याने आरोपी १) मुकेश अरूण मुळे वय ३० वर्ष रा. पचखेडी ता. कुही जि. नागपुर व मालक २) अनील देशमुख यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल व त्यांचा स्टाफ यांनी केली.

# अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक ११/०६/२०२४ रोजी पोस्टे बोरी येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, एक इसम एम आय डी सी चौक बुट्टीबोरी येथून रोडने अवैध्यरीत्या दारू घेवुन जात आहे. अशी माहिती मिळाल्याने एम आय डी सी चौक बुट्टीबोरी येथे सापळा रचुन पायदळ जाणारा आरोपी नामे— उमेश सुर्यभान नगराळे, वय ४४ वर्ष रा. वार्ड क्र. ०६ बुध्द विहार जवळ पवनार ता. जि. वर्धा याचे जवळील बॅगची झडती घेतली असता त्या बॅगमध्ये १) ऑफिसर चाईस विदेशी दारू च्या ३ नग प्रत्येकी ७५० एम. एल प्रति कि. ६२०/—रू. असा एकुण १८६०/— रू. माल, २) ओसी ब्ल्यु विदेशी दारूच्या ७ निपा १८० एम. एल प्रति कि. १५०/—रू. असा एकुण १०५०/— रू. माल ३) रॉयल चाल्यस (त.ब) विदेशी दारूच्या ८ निपा प्रत्येकी १८० एम. एल प्रति कि. १८०/—रू. असा एकुण १४४०/— रू. चा मुद्देमाल असा एकुण ४३५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी विरुद्ध पो.स्टे बोरी येथे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बोरी येथील ठाणेदार ह्रदयनारायण यादव, पोहवा प्रविण देव्हारे, पोशि गौरव मोकळे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर